वाचले :-

१) मुख्याध्यापक, विकॉन हायस्कुल मोशी यांचेकडील क्र.OW/646/BHS/2024 दि.०१/०३/२०२४

२) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.२७/एस.डी.-४ दि.०८ फेब्रुवारी २०२४

३) दिनांक०७/०३/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

कटिबध्दा जनहिताय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११ ०१८
शिक्षण विभाग प्राथमिक
क्र.शिक्षण/खाप्राशा/३/कावि/१८४/२०२४
दिनांक ०७/०३/२०२४

**विषय :- शालेय वेळ बदलण्यास परवानगीबाबत.**

आदेश,

उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये मुख्याध्यापक, बिकॉन हायस्कुल, मोशी यांनी भौतिक सुविधे अभावी शाळेत सर्व विद्यार्थी एका सत्रामध्ये बसू शकत नसल्याने शाळा दोन सत्रामध्ये भरविणेकामी विनंती केलेली आहे.

सबब, मुख्याध्यापक यांनी केलेल्या विनंतीचा विचार करता तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अभ्यासक्रमात अडचण निर्माण होवू नये म्हणुन उपरोक्त वाचले क्र.२ च्या शासन परिपत्रकान्वये बिकॉन हायस्कुल, मोशी शाळेस खालील अटी शर्तीस अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.२७/एस.डी.-४ दि.०८ फेब्रुवारी २०२४ अन्वये पुर्व प्राथमिक ते इ.४ थी पर्यंतचे वर्ग सकाळी ९.०० किंवा ९.०० नंतर ठेवण्यात यावीत.

२) शाळेच्या वेळात बदल करताना बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ नुसार शालेय शिक्षणासाठी अध्ययन व अध्यापनाचा निश्चित केलेला कालावधी कमी होणार नाही याची दक्षता संबंधित शाळा व्यस्थापनाने घ्यावी.

३) शालेय वेळेत बदल केल्याने संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांची तक्रार होणार नाही याबाबत आपले स्तरावरुन दक्षता घेण्यात यावी.

४) शालेय वेळ बदलली म्हणुन शालेय शुल्कामध्ये कोणतीही अतिरिक्त वाढ करणेत येवू नये.

५) तसेच याबाबत पालकाचे संमतीपत्र आपले दप्तरी घेणे आवश्यक राहील.

६) शालेय वेळेत बदल केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात अडचण निर्माण होणार नाही याची शालेय व्यवस्थापनाने दक्षता घ्यावी.

७) याबाबत शाळा स्तरावर शिक्षक पालक संघाची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

८) शाळेमध्ये वर्ग भरवताना शासनाने विहीत केलेले कोविड - १९ विषयक नियमांचे पालन करावे.

९) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदींनुसार शाळेत विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

१०) याबाबत काही वाद अथवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास सदरची परवानगी रद्द करणेत येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळा व्यवस्थापन व मुख्याध्यापक यांची राहील.

7/3/24

(संगीता बांगर)
प्रशासन अधिकारी
शिक्षण विभाग प्राथमिक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे - १८

प्रति,
मुख्याध्यापक,
बिकॉन हायस्कुल, मोशी.